जिल्हा व सत्र न्यायालय, भंडारा

कार्यालयीन आदेश.

क्र. बी/निवडणूक-२०२५/ १४३९ /२०२५, आस्था. दिनांक : २९ नोव्हेंबर, २०२५

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग एक-मध्य उप-विभाग, सामान्य प्रशासन विभाग यांचे कडील अधिसूचना क्र. १७६, दिनांक २६ नोव्हेंबर, २०२५

२) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचे शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०२५/प्र.क्र.२००/कामगार-९, दिनांक २८.११.२०२५

३) माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक जनरल (एडीएम)/ज्येडी./२००७, दिनांक १२ जुन २००७ व सोबत दिनांक ११ जुन, २००७ चे परिपत्रक

४) दिवाणी नियमावली पुस्तिका, १९८६ प्रकरण ३६ मधील परिच्छेद ७०१

५) कार्यालयीन टिप्पणी, दिनांक २९ नोव्हेंबर, २०२५

उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये मा. महाराष्ट्र शासना तर्फे राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणूकांच्या अनुषंगाने मंगळवार दिनांक ०२ डिसेंबर, २०२५ रोजी संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदार संघात सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. त्या अनुषंगाने मी विभाग प्रमुख तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा उपरोक्त संदर्भ क्र. १ ते ४ नुसार खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

मंगळवार, दिनांक ०२ डिसेंबर, २०२५ रोजी नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणूकीच्या अनुषंगाने भंडारा जिल्हयातील पवनी, साकोली, तुमसर व भंडारा येथील न्यायालयांना सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येत आहे. सदर दिवशी उपरोक्त नमूद ठिकाणांचे सर्व न्यायालये व त्यांचे कार्यालयांचे कामकाज बंद राहील. तथापी भंडारा न्यायीक जिल्हयात लाखनी, मोहाडी, लाखांदूर या तालुक्याचे ठिकाणी नगरपरिषद/नगरपंचायत निवडणूक नसल्यामुळे तेथील न्यायालये व त्यांची कार्यालये दिनांक ०२ डिसेंबर २०२५ रोजी सुरू राहतील. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

भंडारा न्यायीक जिल्हयाकरिता वर्ष, २०२५ मध्ये कार्यालयीन कामाचे दिवस अतिरिक्त असल्यामुळे उपरोक्त सुट्टीची भरपाई करण्याची आवश्यकता राहणार नाही.

(राजेश गो. अस्मर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
भंडारा

क्रमांक : बी/निवडणूक-२०२५/४९०३/२०२५,आस्था.

प्रत सस्नेह सादर :-

१) माननीय महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई-४०० ०३२.
२) माननीय प्रबंधक (निरिक्षण-१/२), अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
३) माननीय प्रबंधक, उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर/औरंगाबाद/पणजी.
४) माननीय सर्व प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश. (ई-मेलव्दारे)
५) माननीय जिल्हाधिकारी, भंडारा.
६) माननीय पोलीस अधिक्षक, भंडारा.

प्रत माहितीस्तव अग्रेषित :-

१) न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, भंडारा.
२) जिल्हा न्यायाधीश-१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, भंडारा.
३) जिल्हा न्यायाधीश-२ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, भंडारा.
४) न्यायाधीश, औद्योगिक न्यायालय, भंडारा.
५) तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ तथा सहायक सत्र न्यायाधीश, भंडारा.
६) दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), भंडारा.
७) मुख्य न्यायदंडाधिकारी, भंडारा.
८) सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, भंडारा.
९) सह दिवाणी/२रे/३रे/४थे/५वे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, भंडारा.
१०) दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर (जलदगती न्यायालय), भंडारा.
११) दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, साकोली/लाखनी/पवनी/लाखांदूर/तुमसर/मोहाडी
१२) सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, भंडारा/पवनी.
१३) २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, भंडारा.
१४) न्यायाधीश, कामगार न्यायालय, भंडारा.
१५) अध्यक्ष, जिल्हा ग्राहक मंच, भंडारा.
१६) अधिक्षक, जिल्हा कारागृह, वर्ग-१, भंडारा.
१७) जिल्हा कोषागार अधिकारी, भंडारा.
१८) जिल्हा सरकारी अभियोक्ता, भंडारा.
१९) सहायक संचालक व सरकारी अभियोक्ता, भंडारा
२०) अध्यक्ष/सचिव, जिल्हा अधिवक्ता संघ, भंडारा.
२१) अध्यक्ष/सचिव, तालुका अधिवक्ता संघ, साकोली/लाखनी/पवनी/लाखांदूर/तुमसर/मोहाडी
२२) प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, भंडारा.
२३) न्यायालय व्यवस्थापक, जिल्हा न्यायालय, भंडारा.
२४) अधिक्षक (प्रशासन विभाग/तांत्रिक विभाग), जिल्हा न्यायालय, भंडारा.
२५) सहा. अधिक्षक (प्रशासन/अर्थ व वित्त/निरीक्षण/अभिलेख विभाग), जिल्हा न्यायालय, भंडारा.
२६) वरिष्ठ लिपीक (प्रशा./राजपत्रित/सांख्यिकी/मुद्देमाल/ग्रंथालय/इमारत/अंदाजपत्रक/बेंच क्लर्क) जिल्हा न्यायालय, भंडारा.
२७) कनिष्ठ लिपीक, बेंच क्लर्क/संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, भंडारा.
२८) नोटीस बोर्ड, जिल्हा न्यायालय, भंडारा

यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सादर/अग्रेषित.

(राजेश गो. अस्मर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा.

जिल्हा न्यायालय, भंडारा.
दिनांक: २९ /११/२०२५